दुरध्वनी क्र. 022 25421373
25434349
इमेल - dcfthane@gmail.com
dycftahne@mahaforest.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**

**उप वनसरंक्षक ठाणे वनविभाग ठाणे यांचे कार्यालय**

मॅरेथॉन सर्कल,लाल बहादुर शास्त्री मार्ग नौपाडा ठाणे - 400 602

पत्र जा.क्र.कक्ष -25/मोजणी/एफसीए/2026/2021-22 दिनांक -92 /11/2021

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे

**विषय -** **वन जमीन ठाणे** (क्षेत्र - 32.3577 हे.)
वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत अल्याणी लघुपाटबंधारे योजना, ता.मुरबाड, जि. ठाणे वनजमिन वळते करण्याबाबतचा प्रस्ताव.

**संदर्भ -**
1. प्रधान मुख्य वनंसरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17/ नोडेल/ठाणे/आयडी-12724(68)/1383 दि. 28/10/2021.
2. विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचेकडील पत्र क्र. अ/वसअं/कोकण/3020 दि. 20/12/2021.

विषयांकित प्रकरणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत अल्याणी लघुपाटबंधारे योजना, ता.मुरबाड, जि. ठाणे, वनजमिन मागणी प्रस्तावामधील प्रस्तावित पर्यायी वनीकरणासाठी मौजे जागजी तालुका उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. 308 मधील 20.00 हे. क्षेत्राचे अवलोकन केले असता सदर क्षेत्रामध्ये वनीकरण करण्यात आल्याचे व झाडोरा दिसत असल्याने इतरत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य क्षेत्राची निवड करण्यात येवून सदरहू क्षेत्राची KML File, पर्यायी वनीकरणासाठी 10 वर्षासाठीची योजना Toposheet व Geo-reference Map विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना सादर करण्यास कळविले होते.

त्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्राबाबत पुढील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

सन 1999 मध्ये मौजे जागजी, तालुका उस्मानाबाद येथील सर्व्हे क्र. 308 मधील 20.00 हे. क्षेत्र, पर्यायी वनीकरणासाठी वनविभागाच्या ताब्यात घेतल्यानंतर गावकऱ्यांकडून सदर क्षेत्रावर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे सदर क्षेत्र अतिक्रमणापासून संरक्षित करण्याच्या दृष्टीने सन 2001-02 या आर्थिक वर्षात वनविभागामर्फत ग्लिरिसीडीया या प्रजातीची बी पेरणी 9.00 हे. क्षेत्रावर करण्यात आली होती. उस्मानाबाद वनविभागाच्या मंजूर कार्य आयोजनेमध्ये सदर क्षेत्राचा समावेश करण्यात आल्यानंतर कार्यआयोजनामध्ये नमुद केल्याप्रमाणे विविध योजनेतंर्गत जलसंधारणाची कामे व रोपवनाची कामे 11.00 हे. क्षेत्रावर करण्यात आली आहेत. तसेच अल्याणी लघुपाटबंधारे योजना ता. मुरबाड या प्रकल्पासाठी वन संवर्धन अधिनियम, 1980 अंतर्गत पर्यायी वनीकरण क्षेत्र हे 22 वर्षापूवी वन विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे व प्रस्तावित पर्यायी वनीकरणाचे क्षेत्र वगळता विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यक्षेत्रामध्से इतरत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य क्षेत्र उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. सोबत विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचेकडील संदर्भिय पत्राची प्रत संलग्न केली आहे.

सदर अहवाल माहिती व जरुरी कार्यवाहीस्त्व सादर.

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

(गजेंद्र हिरे)
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वनविभाग, ठाणे**

प्रतिलीपी - विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना महितीस्तव अग्रेषित

# विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकिय ईमारत, गाळा क्र.39, उस्मानाबाद-413501 दु.क्र.(02472-223408) फॅक्स क्र.223907

---

**विषय** – अल्याणी लघुपाटबंधारे योजना तालुका मुरबाड जिल्हा ठाणे या प्रकल्पाकरिता पर्यायी जमीन उपलब्ध करणे बाबत विनंती .

जा.क्र. अ/ वसंअ/ कोकण/3020 /2021-22.

उस्मानाबाद.413501. दिनांक20/12/2021.

प्रति,

अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य नागपुर

संदर्भ –1. मा. प्रधान मुख्यवनसरंक्षक म.रा. नागपुर यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/ 2/आयडी-12724/618/ दिनांक 10.07.2019.

2. आपले कडील पत्र क्रमांक जिजअ (मृवज) विभाग /प्र.शा-2/2338/ दि.10.12.2020.

3. या कार्यालयाचे पत्र क्रमांक अ/ वसंअ/कोकण/2962 / दिनांक 23.12.2020.

4. मा. प्रधान मुख्यवनसरंक्षक म.रा. नागपुर यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/ठाणे/ /आयडी-12724/ 1383// दिनांक 28.10.2021.

5.वनपरिक्षेत्रअधिकारी तुळजापुर मु. उस्मानाबाद यांचे कडील पत्र क्रमांक अ/जमीन/336/ दि.07.12.2021.

उपरोक्त विषयास अनुसरुन अल्याणी लघुपाटबंधारे योजना तालुका मुरबाड जिल्हा ठाणे प्रकल्पाचा वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वन जमीन मागणी प्रस्तावास आवश्यक असलेले पर्यायी क्षेत्र प्रकल्प यंत्रणेने उपलब्ध करुन देण्यात आलेले मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 पैकी क्षेत्र 20.00 हे. व मौजे निलेगांव ता. तुळजापुर येथील गट क्रमांक 176 मधील 30 हेक्टर पैकी 12.36 हेक्टर मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी दिनांक 06/11/1999 च्या आदेशान्वये अल्याणी लघुपाटबंधारे योजना तालुका मुरबाड जिल्हा ठाणे या प्रकल्पा अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्तावासदर्भात पर्यायी वन जमीन म्हणुन मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 क्षेत्र 20.00 हे. क्षेत्र वनजमीन वनखात्याकडे या पुर्वीच वर्ग करण्यात आलेली आहे. सदर क्षेत्रावर कसल्याही प्रकारचे अतिक्रमण नसले बाबत विहित नमुन्यातील प्रमाणपत्र क्रमांक 9 व 10 , Dizital टोपोशिट व गावनकाशे व K.M.L. फाईल सॉप्ट कॉपी , सदर क्षेत्राचे भारतीय वन अधिनियम 1927 अन्वये राखीव वन म्हणुन घोषित करण्यात आलेल्या राजपत्राची प्रत वरील संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये जिल्हा संधारण अधिकारी , मृदु व जलसंधारण विभाग, कळवा ठाणे. यांना प्राप्त पर्यायी वनीकरणा बाबतचा प्रस्ताव सादर करणेकामी देण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने संबंधीत यंत्रणेने प्रस्ताव तयार करुन आवश्यक दस्ताऐवजासह आपणाकडे सादर करणेत आलेला होता.

संदर्भीय पत्र क्रमांक 4 मध्ये नमुद केल्यानुसार पर्यायी वनीकरण क्षेत्र मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 पैकी क्षेत्र 20.00 हे. क्षेत्र मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी दिनांक 06/11/1999 च्या आदेशान्वये पर्यायी वनीकरणाचे क्षेत्र वनविभागाने ताब्यात घेतल्यावर गावक-याकडुन सदर क्षेत्रावर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे सदर क्षेत्राचा ताबा घेतल्यावर क्षेत्राचे अतिक्रमणापासुन संरक्षित करण्याच्या दृष्टीने सन 2001-02 या अर्थिक वर्षात वनविभागामार्फत गिलरीसिडीया या प्रजातीची बी पेरणी करण्यात आलेली होती. सदर क्षेत्राचा समावेश उस्मानाबाद वनविभागाच्या मंजुर कार्यआयोजनेत समाविष्ठ करण्यात आलेला आहे. मंजुर कार्यआयोजनेत नमुद केल्यानुसार सदर क्षेत्रात विविध योजने अंतर्गत जलसंधारणाची कामे वनपरिक्षेत्र

अधिकारी , तुळजापुर मु. उस्मानाबाद यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. पर्यायी वनीकरण क्षेत्रावर अतिक्रमण होवु नये म्हणुन मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 पैकी क्षेत्र 20.00 हे क्षेत्रावर खालील योजने अंतर्गत रोपवनाची कामे व घनवनाची कामे करण्यात आलेली आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापुर मु. उस्मानाबाद यांनी वरील सदंर्भिय पत्र क्रमांक 5 अन्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे

| अ.क्र. | गावाचे नांव | क्षेत्र हे.मध्ये | कामाचा प्रकार | योजना | अंदाज पत्रकीय रक्कम (लक्ष) | लावलेल्या रोपाची संख्या | झालेला खर्च | जिवंत रोपाची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | जागजी जागजी 2020-21 ) | 10.00 | रोपवन पुर्व पावसाळी कामे | M.A.P. | 17.07 | 16000 | 17.07 | 100 % | |
| | | | प्रथम वर्ष कामे | | 12.59 | | 5.24 | | |
| 2. | जागजी 2020-21 ) | 0.50 | घन वृक्षलागवड पुर्व पावसाळी कामे | R.D.F. . | 9.22 | | 9.22 | 100 % | |
| | | | प्रथम वर्ष वृक्षलागवड | | 13.64 | | 8.46 | | |
| 3. | जागजी (2019-20 ) | 0.50 | घन वृक्षलागवड पुर्व पावसाळी कामे | R.D.F. | 9.15 | | 9.15 | 97 % | |
| | | | प्रथम वर्ष वृक्षलागवड | | 10.26 | | 10.26 | | |
| | | | द्वितीय वर्ष रोपवन कामे | | 9.10 | | 4.58 | | |

मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 पैकी क्षेत्र 20.00 हे.पैकी 11.00 हेक्टर क्षेत्रावर वरील प्रमाणे कामे करण्यात आलेली असुन उर्वरित 9.00 हेक्टर क्षेत्रावर गिल्रीसिडीया या प्रजातीचा झाडोरा मोठया प्रमाणावर आहे.

अल्याणी लघुपाटबंधारे योजना तालुका मुरबाड जिल्हा ठाणे प्रकल्पाचा वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वन जमीन मागणी प्रस्तावास आवश्यक असलेले पर्यायी वनीकरण क्षेत्र हे मौजे जागजी ता.उस्मानाबाद येथील गट क्रमांक 308 पैकी क्षेत्र 20.00 हे. 22 वर्षापुर्वीच वनविभागाच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. तरी प्रस्तावीत पर्यायी वनीकरणाचे क्षेत्र वगळता इतरत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य क्षेत्र या वनविभागात उपलब्ध नाही.

करिता माहितीसाठी सविनय सादर.

( एम.आर.मायकर )
विभागीय वन अधिकारी
उस्मानाबाद

प्रतिलिपी - मा. मुख्य वनसंरक्षक प्रा. औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी - मा. मुख्य वनसंरक्षक प्रा. ठाणे, यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी - उपवनसंरक्षक प्रा. ठाणे,वनविभाग , ठाणे. यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी - जिल्हा संधारण अधिकारी , मृदु व जलसंधारण विभाग, कळवा ठाणे.